# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक ०८/१२/२०१८

**मौजा कोटमी येथील गावक-यांनी नक्षली बॅनर जाळुन नक्षल सप्ताहचा निषेध केला**

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम अशा एटापल्ली तालुक्यातील पोलीस मदत केंद्र कोटमी हद्दीतील मौजा कोटमी परिसरात नक्षल्यांनी पिएलजीए सप्ताहच्या अनुषंगाने बंद पाळण्याकरीता रस्त्यावर बॅनर लावले होते. सदर बॅनरला विरोध करुन कोटमी येथील गावक-यांनी स्वताहुन एकजुट होवुन नक्षलनी लावलेले बॅनर काढुन नक्षलांचा निषेध करत नक्षली बॅनर व पॅम्पलेट जाळुन त्याची होळी केली. त्यानंतर ग्रामस्थांनी पोलीसांच्या मदतीने कोटमी गावामधे कॅन्डल लावुन नक्षल विरोधी शांतता रॅली काढली.

तरी एकेकाळी अतिनक्षलग्रस्त भाग म्हणुन ओळखला जाणारा कोटमी परिसर हा नवयुवकांच्या शिक्षणामुळे व नक्षल हे विकास विरोधी धोरणाचे असल्याने येथील ग्रामस्य नक्षलवाद्यांना विरोध करतांना दिसुन येत आहे.

